# Pimpri Chinchwad Police Commissionerate

## प्रेसनोट दि.१०/०५/२०२१

## गुंडा विरोधी पथक, गुन्हे शाखेची मोठी कारवाई

### मोक्का गुन्हयातील ०३ पाहीजे सराईत आरोपींना ०१ पिस्तोल, ०२ जिवंत काडतुसे व ०२ लोखंडी कोयत्यांसह अटक

दि.०७/०५/२०२१ रोजी गुंडा विरोधी पथक, गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड चे पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार असे मा. श्री. प्रशांत अमृतकर सो. सहा पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड यांचे आदेशाने वाकड पोलीस ठाणे गु.र.नं.१८६/२०२१ भा.द.वि.क.३०७,३२४,३२६,१४३,१४७,१४८,१४९,५०४,५०६(२),४२७ क्रिमी. लॉ अमेंडमेंट ॲक्ट कलम ३ व ७, भारतीय शस्त्र अधिनियम कलम ४,२५, महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ (१) सह १३५ तसेच महाराष्ट्र गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१)(ii)३(४) या गुन्हयातील पाहीजे आरोपीचा शोध घेत असताना पाहीजे आरोपी नामे हैदर हा त्याचे साथीदार पाहिजे आरोपी नामे दिपक सगर व सोन्या सावंत यांचेसह पवनाघाट स्मशानभुमी काळेवाडी, पिंपरी पुणे येथे बसलेला आहे, हैदर याने अंगात ग्रे रंगाचा हाफ टि शर्ट व निळया रंगाची ट्रॅक पॅन्ट घातलेली असुन दिपक सगर याने अंगात निळसर रंगाचा हाफ टि शर्ट व निळया रंगाची ट्रॅक पॅन्ट तसेच सोन्या सावंत याने मरुन रंगाचा टिशर्ट व काळया रंगाची ट्रॅक पॅन्ट असे कपडे घातलेले असुन त्यांचेकडे हत्यारे असुन ते पुन्हा भांडणे करण्याचे तयारीत आहेत वगैरे मिळाले बातमी वरुन आरोपी इसम नामे **१) हैदर जावेद सय्यद, वय २८ वर्षे, रा. मुक्ती हौसींग सोसायटी, फलॅट नं. १, काशीदनगर, गुरव पिंपळे, सांगवी, पुणे २) दिपक भिमराव सगर, वय २१ वर्षे, रा. तुळजाभवाणी मंदीरासमोर, कोकणेनगर, काळेवाडी, पिंपरी, पुणे व ३) प्रथमेश ऊर्फ सोन्या यशवंत सावंत, वय २० वर्षे, रा. श्रीकृष्ण कॉलनी, नंबर २, भाग्यवंती मंदीरासमोर, कोकणेनगर, काळेवाडी, पिंपरी, पुणे** यांना सदर ठिकाणी घेराव घालुन ०१ पिस्तोल, ०२ जिवंत काडतुसे व ०२ लोखंडी कोयत्यांसह शिताफिने ताब्यात घेवुन प्रथम त्यांचे विरोधात वाकड पोलीस ठाणे येथे गु.र.नं.४०९/२०२१, भारतीय शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३,४,२५ सह महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ (१)(३) सह १३५ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला असुन सदर गुन्हयात त्यांना अटक करण्यात आली असुन त्यांना मा. न्यायालयात हजर करुन त्यांची दि. ११/०५/२०२१ रोजी पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड घेण्यात आली आहे.

सदर आरोपींना मोक्का गुन्हयात वर्ग करुन घेणेबाबत मा. सहाय्यक पोलीस आयुक्त सो. देहुरोड विभाग,पिंपरी चिंचवड यांचे कार्यालयात माहीती देण्यात आली आहे.

आरोपी नामे :- **हैदर जावेद सय्यद** याचेवर दाखल असलेले गुन्हे

| अ.क्र. | पो.स्टे. | गु.र.नंबर | कलम |
|---|---|---|---|
| १ | वाकड | ५११/२०१५ | भादवि ३०७,१४३,१४४,१४७,१४८,१४९ |
| २ | हिंजवडी | ३०९८/२०१५ | आर्म ॲक्ट ७(२५) महा. पोलीस कायदा कलम ३७(१) सह १३५ |
| ३ | निगडी | ४०८/२०१४ | भादवि ३०७,१४३,१४४,१४७,१४८,१४९ आर्म ॲक्ट ४ (२५) |
| ४ | हिंजवडी | ३८१/२०१० | भादवि ३०२,१४३,१४७,१४९, महा. पोलीस कायदा कलम ३७(१) सह १३५ |
| ५ | वाकड | १८६/२०२१ | भा.द.वि.क.३०७,३२४,३२६,१४३,१४७,१४८,१४९,५०४,५०६(२),४२७ क्रिमी. लॉ अमेंडमेंट ॲक्ट कलम ३ व ७, भारतीय शस्त्र अधिनियम कलम ४,२५, महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ (१) सह १३५ तसेच महाराष्ट्र गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१)(ii)३(४) |

आरोपी नामे :- **प्रथमेश ऊर्फ सोन्या यशवंत सावंत** याचेवर दाखल असलेले गुन्हे

| अ.क्र. | पो.स्टे. | गु.र.नंबर | कलम |
|---|---|---|---|
| १ | वाकड | ६०६/२०२० | भारतीय शस्त्र अधिनियम कलम ४,२५, महा.पो.का.कलम ३७ (१) सह १३५, क्रिमी. लॉ अमेंडमेंट ॲक्ट कलम ३ व ७ |
| २ | वाकड | ८१९/२०१९ | भादवि ३२४,३२३,५०४,३४ |
| ३ | वाकड | १८६/२०२१ | भा.द.वि.क.३०७,३२४,३२६,१४३,१४७,१४८,१४९,५०४,५०६(२),४२७ क्रिमी. लॉ अमेंडमेंट ॲक्ट कलम ३ व ७, भारतीय शस्त्र अधिनियम कलम ४,२५, महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ (१) सह १३५ तसेच महाराष्ट्र गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१)(ii)३(४) |

आरोपी नामे :- **दिपक भिमराव सगर** याचेवर दाखल असलेले गुन्हे

| अ.क्र. | पो.स्टे. | गु.र.नंबर | कलम |
|---|---|---|---|
| १ | वाकड | ६०६/२०२० | भारतीय शस्त्र अधिनियम कलम ४,२५, महा.पो.का.कलम ३७ (१) सह १३५, क्रिमी. लॉ अमेंडमेंट ॲक्ट कलम ३ व ७ |
| २ | वाकड | १८६/२०२१ | भा.द.वि.क.३०७,३२४,३२६,१४३,१४७,१४८,१४९,५०४,५०६(२),४२७ क्रिमी. लॉ अमेंडमेंट ॲक्ट कलम ३ व ७, भारतीय शस्त्र अधिनियम कलम ४,२५, महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ (१) सह १३५ तसेच महाराष्ट्र गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१)(ii)३(४) |

गुंडा विरोधी पथक, गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड या पथकाने एक महीण्याचे कालावधीत पिंपरी चिंचवड परीसरातील गुन्हेगारी टोळयांची माहीती प्राप्त करीत असताना महाराष्ट्र गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे क. ३(१)(ii),३(४) (मोका) या गुन्हयातील एकुण ०९ आरोपी आरोपीना पकडुन संबधीत पोलीस ठाणेस हजर केले आहे.

सदरची कारवाई ही मा. श्री. कृष्ण प्रकाश सो.,पोलीस आयुक्त, मा. श्री. रामनाथ पोकळे सो., अपर पोलीस आयुक्त मा. श्री. सुधीर हिरेमठ सो. पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा. श्री. प्रशांत अमृतकर सो. सहा पोलीस आयुक्त, गुन्हे यांचे मार्गदर्शनाखाली एच.व्ही. माने, सहायक पोलीस निरीक्षक पोलीस अंमलदार - हजरत पठाण, प्रविण तापकिर, गणेश मेदगे, विजय तेलेवार, रामदास मोहीते व शुभम कदम यांनी केली आहे.